# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३१ वा बुधवार दि.३० ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लाडक्या बहिणीच महाविकास आघाडीला हद्दपार करतील - महामंत्री विनोद तावडे

## आ.संभाजीराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल







### रेल्वेसह मंत्रीपदही देणार - विनोद तावडे

सभेत बोलताना विनोद तावडे म्हणाले की, विकासासाठी कायम तत्पर असणारे आ. संभाजीराव पाटील निलंगेकर हे आमचे मित्र आहेत.ते कधीही काहीही मागत नाहीत.प्रथमच त्यांनी रेल्वे संदर्भात मागणी केली आहे. त्यासाठी आपण केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू.आपण संभाजीरावांना एक लाखाहून अधिक मताधिक्य दिले तर त्यांना मंत्रिपद देऊ,असा शब्दही विनोद तावडे यांनी दिला.

### विराट सभेने विजयावर शिक्कामोर्तब ....

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आयोजित सभेला हजारोंच्या संख्येने मतदार व नागरिक उपस्थित होते. सर्वत्र ढोल-ताशांचा गजर सुरू होता. हातात झेंडे घेतलेले हजारो नागरिक,प्रचंड घोषणाबाजी यामुळे संपूर्ण निलंगा शहर भाजपमय झाले होते. महिलांची संख्या लक्षणीय होती.उपस्थितांच्या गर्दीने निलंगा शहर जवळपास पाच तास जाम झाले होते.यामुळे उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशीच आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा ऐकण्यात येत होती.

निलंगा /प्रतिनिधी :- महायुती सरकारने अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत.शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी,एक रुपयात पीक विमा, अतिवृष्टी अनुदान या योजनांसोबतच महत्वाकांक्षी लाडकी बहीण योजना सरकारने राबवली.या योजनेत राज्यातील अडीच कोटी महिलांना लाभ मिळाला असून या बहिणींनी महायुतीच्या उमेदवाराला आशीर्वाद दिल्यास महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा सुपडा साफ होईल,असे प्रतिसादन भाजपाचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांनी केले.

भाजपा महायुतीचे उमेदवार माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आयोजित आशीर्वाद सभेत तावडे बोलत होते. यावेळी क्रीडामंत्री संजय बनसोडे,माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर,हुमनाबादचे आ.सिद्धू पाटील, बसवकल्याणचे आ.शरणू सलगर,माजी आमदार गोविंद केंद्रे,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने,युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर,जिल्हा बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मिलिंद लातूरे,राहूल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके,भारतबाई साळुंके, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा संघटन सरचिटणीस संजय दोरवे, निलंगा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे,शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील,देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे,विनोद आर्य, सभापती शिवकुमार चिंचनसुरे,नरसिंग बिरादार,सुधीर पाटील, राजवीर पाटील निलंगेकर यांच्यासह मान्यवर या सभेला उपस्थित होते.

या विराट सभेस मार्गदर्शन करताना विनोद तावडे म्हणाले,२०१९ च्या निवडणुकीत शिवसेना व भाजपा एकत्र लढल्यामुळे मतदारांनी मोठा कौल दिला होता.मात्र सत्तेसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपची साथ सोडून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सोबत घरोबा केला.गद्दारीची सुरुवात उद्धव ठाकरे यांच्यापासूनच झाली. सुरुवात तुम्ही केली.'हम किसीको छेडते नही और हमको छेडा तो छोडते नही ' अशा शब्दात त्यांनी उद्धव ठाकरे व शरद पवार यांचा समाचार घेतला.

विनोद तावडे म्हणाले की,२०४७ ला देशाच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारताचा साक्षीदार आपण सर्वांना व्हायचे आहे. त्यासाठी महाराष्ट्रात महायुतीची सत्ता येणे गरजेचे आहे. अनेक महत्वाकांक्षी योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्यात राबविण्यात येत आहेत,असे ते म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत आघाडीला २ कोटी ७० लाख मतदान झाले होते.राज्यात अडीच कोटी महिलांना 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळाला असून या लाडक्या बहिणींनी आशीर्वादरूपी मतदान करून महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्यावे. फक्त लाडक्या बहिणीने मतदान केले तर महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा सुपडा साफ होणार आहे.एक रुपयात पीक विमा,शेतकऱ्यांना मोफत वीज,अतिवृष्टी अनुदान अशा अनेक योजना राज्यात राबवल्या आहेत.शासनाने लाडकी बहीण योजना जाहीर केल्यानंतर खा.सुप्रिया सुळे व शरद पवार यांच्या पोटात गोळा उठल्याची टिप्पणीही त्यांनी केली.

यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, रस्ते,इमारती असा विकास होतच असतो पण मतदारसंघातील प्रत्येक उंबरठ्याचे उत्पन्न वाढविण्याचे काम आपण केले आहे.या कामात खोडा घालण्याचे काम जिल्ह्यातील काही नेत्यांनी केले.महाविकास आघाडी सरकारच्या काळात माझ्यावरील राग मतदारसंघातील जनतेवर काढला.कोविडच्या संकटात ऑक्सिजन सिलेंडर मिळू दिले नाहीत. जनतेच्या प्रत्येक सुखदुःखात मी सोबत आहे.त्यांच्याच आशीर्वादाने महायुती सरकार आल्यानंतर मतदारसंघाच्या विकासाचा अनुशेष भरून काढत विकासाची गंगा वाहती केली.ज्या मंडळींनी मला त्रास दिला त्यांनी मागच्या १० वर्षात आपल्या मतदारसंघात किती निधी आणला ? ते सांगावे.निलंगासाठी मी आणलेल्या निधीच्या १० टक्के निधी जरी त्यांनी आणला असेल तर मी निवडणुकीतून माघार घेईन. ही लढाई निलंग्याच्या स्वाभिमानाची आहे. निलंगा विरुद्ध काँग्रेसची बी टीम अर्थात बाभळगाव यांच्यात ही लढाई होत आहे. निलंग्याचे मतदार माझ्यासोबत आहेत. आपले आशीर्वाद व पाठबळावरच आजवरची वाटचाल सुरू असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले.

निलंगा मतदार संघातून जाणाऱ्या रेल्वे लाईनचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.पुढील कामासाठी आपण पुढाकार घ्यावा,अशी अपेक्षा आ. निलंगेकर यांनी व्यक्त केली. सामाजिक,जातीय व सांस्कृतिक एकोपा कायम राखण्यासाठी काँग्रेसला हद्दपार करा,असे आवाहनही त्यांनी केले.

जनसमुदायाला मार्गदर्शन करताना माजी खासदार रूपाताई पाटील म्हणाल्या की,निलंग्याची जनता स्वाभिमानी आहे. जिल्ह्यातील काही नेत्यांनी निलंग्याला डिवचण्याचे काम करत अपप्रचार चालवला आहे. जनतेत संभ्रम पसरवला जात आहे.यापुढे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत.निलंग्याचे मतदार अशा लोकांना जागा दाखवतील असे सांगून या निवडणुकीत आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांना आशीर्वाद द्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.

युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर म्हणाले की,संयम व समर्थन हे दोन गुण आम्ही विनोद तावडे यांच्याकडूनच शिकलो.मागील काळात आम्ही बॅकफुटवर काम केले.तरीही शासनाची प्रत्येक योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत राहिलो.आता आपण आम्हाला फ्रंटफुट वर खेळण्याची संधी द्यावी. त्यासाठी आपण आम्हाला ताकद द्या.नम्रतेने वागत आम्ही जनतेची सेवा करू. कार्यकर्त्यांनी जिल्हा व मतदारसंघाच्या विकासासाठी पुढील २० दिवस द्यावेत.तुमचा भाऊ,मित्र,मुलगा म्हणून मी सर्वांसोबत राहून विकासासाठी प्रयत्नशील राहीन,असेही ते म्हणाले.

यावेळी आ.सिद्धू पाटील,आ.शरणू सलगर, संजय दोरवे,भगवानराव पाटील तळेगावकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद पाटील निलंगेकर यांनी केले.या आशीर्वाद सभेस निलंगा मतदारसंघातील निलंगा,देवणी व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती होती.

---

# डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल




लातूर :- लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या भारतीय जनता पार्टी - महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मंगळवारी महायुतीचे प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, अभिमन्यू पवार, बाबासाहेब पाटील, शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे, शैलेश लाहोटी, शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख ड. बळवंत जाधव, बालाजी काकडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मकरंद सावे, प्रशांत पाटील, सचिन दाणे, जितेंद्र बनसोडे, एन. डी. सोनकांबळे, भाजपा जिल्हा सरचिटणीस ड.दिग्विजय काथवटे, शिरीष कुलकर्णी, प्रवीण सावंत, मिनाताई भोसले , संगायोचे चेअरमन शिवसिंह सिसोदिया, लालासाहेब देशमुख, शैलेश स्वामी, शैलेश गोजमगुंडे, संगीत रंदाळे, शोभाताई पाटील, रागीणीताई यादव, आरोशी सोनवणे व सर्व मोर्चा अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, महायुतीच्या घटक पक्षांचे प्रमुख कार्यकर्ते - पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपच्या वतीने डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना उमेदवारी देण्यात आल्याने भाजपच्या कार्यकर्त्यात उत्साह संचारल्याचे दिसून येत आहे. डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लातूर शहर मतदार संघातील मतदारांच्या भेटीगाठींवर अगोदरपासूनच भर दिला होता. मतदार संघातील जवळपास सर्वच परिसरातील मतदारांच्या भेटी घेऊन त्यांनी मतदारांशी सुसंवाद साधण्याचे काम केले आहे. डॉ. अर्चनाताईंच्या उमेदवारीमुळे भाजपसह महायुतीच्या कार्यकर्त्यातून विशेषतः महिला मतदारांतून समाधान व्यक्त केले जात असल्याचे दृष्टिपथास येत आहे.

# केज मध्ये होणार चौरंगी लढत...?

केज/प्रतिनिधी महाराष्ट्र राज्यातील पंधराव्या विधानसभेचा बिगुल वाजला असुन बीड जिल्ह्यातील लक्षवेधी मतदार संघ असणाऱ्या केज विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ ला मतदान होत आहे. केज मतदार संघ हा नेहमी चर्चेत असतो या मतदारसंघातून अनेक ज्येष्ठ राजकीय नेत्यांनी केज विधानसभेचे प्रतिनिधित्व केले आहे. यात ज्येष्ठ बाबुराव आडसकर यांनी विधानसभा गाजवली, सुंदरराव सोळंके यांना नंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री पद मिळाले होते, डॉ.विमलताई मुंदडा या राज्य मंत्रिमंडळात मंत्री होत्या, असा राज्यात लक्ष वेधून घेणाऱ्या मतदारसंघ म्हणजे केज हा मतदारसंघ अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव आहे त्या पार्श्वभूमीवर आता अनेक इच्छुकांच्या उमेदवारीमुळे वातावरण तापू लागले आहे. या मतदारसंघाचा इतिहास पहिला तर १९६२ पासून आतापर्यंत म्हणजे एकूण १४ विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसने ५ वेळा, राष्ट्रवादी काँग्रेसने ४ वेळा आणि भाजपने ३ वेळा तर अपक्षाने १ वेळा या मतदारसंघातून निवडणूक जिंकली आहे.



सर्वात जास्त वेळा प्रतिनिधित्व करण्याची संधी १९९० पासून २००९ पर्यंत या मतदारसंघातून विमलताई मुंदडा या २ वेळा भाजपकडून ३ वेळा राष्ट्रवादी काँग्रेस कडून सलग ५ वेळा निवडून गेल्या होत्या. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत केज विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे बजरंग सोनवणे आणि भाजपच्या पंकजाताई मुंडे यांच्या लढतीत या विधानसभा मतदारसंघातून १४ हजारची लीड बजरंग सोनवणे यांना मिळाली होती, विशेष म्हणजे राखीव असलेल्या केज विधानसभेत जातीय समीकरण केज विधानसभा मतदारसंघांमध्ये वंजारी समाजाचे मतदान हे निर्णायक असते जवळपास ८० हजार मतदान हे वंजारी समाजाचे आहे. तर १ लाखांपेक्षाही जास्त मतदान हे मराठा समाजाचे आहे. त्या खालोखाल ५० हजार मतदान हे मुस्लीम समाजाचं आहे. यासोबतच ६० हजार मतदान हे इतर मागासवर्गीय समाजाचे आहे.केज विधानसभा हा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव असून या मतदारसंघात महायुती कडून विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांनाच उमेदवारी दिली आहे तर महाविकास आघाडी कडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने माजी आमदार पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी जाहीर केली त्यामुळे इच्छुकांच्या यादीतील बहुजन रयत परिषदेचे अध्यक्ष रमेश गालफाडे यांनी मनसेचा मार्ग धरला असून , माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी अपक्ष लढण्यासाठी उमेद्वारी अर्ज दाखल केला आहे. तसेच केज मधील भाजपचे नेते रमेशराव आडसकर यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (शरद पवार)प्रवेश केलेला असला तरी त्यांनाही पक्षाने उमेद्वारी दिली नाही त्यामुळे केज मतदारसंघांतील राजकीय समीकरण बदलनार असे दिसून येत आहे आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये केज विधानसभा मतदारसंघांमध्ये चौरंगी लढत होण्याची शक्यता सध्यातरी दिसून येत आहे.

---

## भाजपचे माजी खासदार सुधाकर शृंगारेचा काँग्रेसमध्ये प्रवेश भर सभेत अमित देशमुख यांचा भाजपला हाय व्होल्टेज झटका

लातूर/ प्रतिनिधी- भाजपचे माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी मंगळवारी हजारो लोकांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचार शुभारंभांच्या सभेतच सुधाकर शृंगारे यांनी भाजपला मोठा धक्का दिला आहे. भाजपमध्ये माझा आवाज दाबला जात होता. मला नुकताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रचारासाठीही फिरु दिले गेले नाही, असा गंभीर आरोप माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी केला. लातूर शहरचे आमदार अमित विलासराव देशमुख आणि लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रचार सभेचा शुभारंभ शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रचार सभेला हजारो लोकांची उपस्थिती होती. यावेळी निवेदकांनी उपस्थितांना आश्चर्याचा धक्का देणारी एक घोषणा केली. भाजपचे माजी खासदार सुधाकर शृंगारे हे काँग्रेसमध्ये प्रवेश करत असल्याचे जाहीर करताच उपस्थितांनी टाळ्या व शिट्यांच्या गजरात याचे स्वागत केले. काँग्रेसमध्ये येताच शृंगारे म्हणाले, 'हा माझा पुनर्जन्म' आज माझा पुन्हा नव्याने जन्म झाला आहे. आज मी भाजपमधून काँग्रेसमध्ये आलो आहे. याचे सर्व श्रेय आमदार अमित देशमुखांना जाते. नुकताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत माझा पराभव कसा झाला याची माहिती अमित देशमुख यांना आहे. भाजपचे काम मी प्रामाणिक पणे केले. सात-आठ वर्षे पक्ष लातूरमध्ये जिवंत ठेवण्याचे काम मी केले. पण माझ्या प्रचाराच्या वेळी इथल्या स्थानिक नेत्यांनी मला साथ दिली नाही. कोणी आजारपणाचे सोंग केले, कोणी मला मतदारसंघात फिरु दिले नाही, मला कुठे जाऊ दिले गेले नाही.



इथल्या प्रत्येक नेत्याने माझ्याविरोधात षडयंत्र केले. मला बाहेर पडू दिले नाही. पण आता यातल्या एकालाही सोडायचे नाही. महाविकास आघाडीचे सहाच्या सहा उमेदवार आपल्याला निवडून आणायचे आहेत, असे म्हणत अमित देशमुख आणि धिरज देशमुख यांना प्रचंड बहुमताने निवडून आणायचं हेच एकमेव माझं मिशन आहे आणि त्यासाठीच मी काँग्रेसमध्ये आलोय, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. आमदार अमित देशमुख यांनी सुधाकर शृंगारे यांना काँग्रेस पक्षात योग्य तो मान दिला जाईल तसेच त्यांचे योग्य ते पुनर्वसन केले जाईल, असा शब्द दिला. सुधाकर शृंगारे यांनी हजारो लोकांच्या उपस्थितीत केलेला काँग्रेस प्रवेश भाजपसाठी धोक्याची घंटा असल्याचे बोलले जात आहे. शृंगारे हे पहिल्यांदा २०१९ मध्ये भाजपकडून लातूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते. २०२४ मध्ये भाजपने त्यांना पुन्हा उमेदवारी दिली होती. परंतु, काँग्रेसचे डॉ. शिवाजी काळगे यांच्याकडून त्यांचा पराभव झाला होता.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# 'मोसाद' कमबॅक!

मोसादजवळ टॉप क्लास सिक्रेट एजंट आहेत. हायटेक इंटेलिजन्स टीम, शार्प शूटर आणि विषकन्या सौंदर्यवतींसह अनेक गुप्तहेर आणि समर्पित गुप्तयोद्ध्यांची फौज आहे. या गुप्तचर संस्थांनी सध्याच्या युद्धात भरीव कामगिरी केली आहे.हमासने अचानक गाझा पट्टी जवळ असलेल्या इस्त्रायलमधील शहरांवर ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हल्ला केला. या हल्ल्याची पूर्व माहिती नसणं, हे 'मोसाद'चं मोठं अपयश होते. परंतु या एका अपयशानंतर गेल्या वर्षभरात चाललेल्या युद्धामध्ये इस्त्रायली गुप्तहेर संस्थांची कामगिरी ही जागतिक दर्जाची आणि अतिशय उत्कृष्ट अशी झाली आहे. त्यांनी पुरवलेल्या गुप्तहेर माहितीमुळे हमास, हिजबुल्लाह, इराणला जमिनीवर आणले आहे.

गुप्त पद्धतीने कार्य करून माहिती मिळवणे हे एक कौशल्य आहे. यात मोठा धोका असतो. त्यांना दिल्या जाणार्या कठोर प्रशिक्षणानंतर हे गुप्तहेर खूप खास बनतात. तेहरानमध्ये क्षेपणास्त्र हल्ल्यात हमास या संघटनेचा राजकीय चेहरा असलेला इस्माइल हनीयेह ठार झाला. इस्त्रायलची गुप्तचर संस्था त्यांच्या मागावर होती. तेहरानमधील त्यांच्या राहत्या घरी आंघोळ करत असताना हत्या झाली.

त्यांच्या घरावर क्षेपणास्त्र डागण्यात आल्यानं मोठा स्फोट झाला. कोणत्याही त्रयस्त देशातदेखील मोसाद यशस्वीपणे हल्ला करून शत्रूला अक्षरश: वेचून वेचून मारण्यासाठी ओळखली जाते. परक्या मुलखात अशा मोहिमा तडीस नेणे धोकादायक असते. प्रसंगी युद्धदेखील होऊ शकते. परंतु कोणतीही जोखीम ही संघटना घेते. मोसाद ह्युमन इंटेलिजन्स आणि सिग्नल इंटेलिजन्स अशा अनेक पद्धतीचा वापर करून शत्रूचा नायनाट करते.

मोसाचे टॉप क्लास सिक्रेट एजंट मोसाद ही इस्त्रायलच्या तीन प्रमुख गुप्तचर संस्थांपैकी एक आहे. अमन, शिन बेट आणि मोसाद अशी त्यांची नावे आहेत. अमन (लष्करी गुप्तचर शाखा) आणि शिन बेट (अंतर्गत सुरक्षा शाखा) आणि मोसाद परदेशात गुप्त माहिती गोळा करते, गुप्त माहितीचे विश्लेषण आणि गुप्त ऑपरेशन्सशी संबंधित कामे करीत असते. मोसादची दोन स्वतंत्र काउंटर टेररिझम युनिट्स आहेत. पहिल्या युनिटचे नाव मेटसाडा असून ती शत्रूवर हल्ला करते. दुसरी किडोन युनिट असून हिचे काम गुप्तपणे चालते. मुख्यत: अतिरेक्यांचा खातमा करते. मेटसाडाची देखील स्वतंत्र युनिट्स आहेत.

मोसादचे हेर इतक्या सफाईने एखाद्या मोहिमेला तडीस नेतात की कोणताही पुरावा मागे शिल्लक ठेवत नाहीत. 'मोसाद' इस्त्रायल आणि ज्यूंच्या रक्षणासाठी सक्रिय असून अन्य देशांच्या गुप्तहेर संघटनाशी गुप्तपद्धतीने संबंध विकसित करीत आहे. इस्त्रायलशी उघडपणे समर्थन न देणार्या देशांशी देखील मोसादने गुप्तसंबंध प्रस्थापित केलेले आहेत.

इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी यांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला. त्या आधी इराणचे अणुशास्त्रज्ञ मोहसेन फखरीजादेह यांची २७ नोव्हेंबर २०२० मध्ये तेहरानच्या बाहेर रस्त्याच्या कडेला ते कारमधून जात असताना सॅटेलाइट कंट्रोल मशिनगनद्वारे हत्या झाली होती. त्यांच्या सोबत ११ बॉडीगार्डचा ताफा होता. तरीही त्यांचे प्राण वाचविणे शक्य झाले नव्हते.

हिजबुल्लाहच्या सदस्यांकडे असलेल्या पेजर आणि संवादाच्या इतर साधनांचा स्फोट झाल्याने प्रचंड खळबळ उडाली. इस्त्रायलच्या गुप्तहेर संघटनांना आपला ठावठिकाणा कळू नये, या उद्देशाने या उपकरणांचा वापर केला जात होता. मात्र, ते वापरणार्या सदस्यांच्या हातातच त्याचा स्फोट झाला. त्यामुळे अनेक सदस्यांचा मृत्यू झाला आणि हजारो जखमी झाले.

इस्त्रायलची प्रबळ इच्छाशक्ती इस्त्रायलच्या सगळ्या संस्थांची म्हणजे सैन्य, सरकार, राजकीय नेतृत्व, गुप्तहेर खातं यांची इच्छाशक्ती अतिशय प्रबळ आहे. इस्त्रायलने योग्य पद्धतीने योजना आखल्या आणि त्यांची काटेकोर पद्धतीने अंमलबजावणी केली. देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करणार्यांविरोधात एकत्रितपणे लढा देणार्या विभागांमध्ये गुप्तहेर विभागाचा सहभाग महत्त्वाचा आहे. हेरगिरी हा जगातील सर्वात जुना द्वितीय क्रमांक मिळवलेला व्यवसाय आहे.राष्ट्रप्रेमाची अनोखी भावना इस्त्रायलमध्ये लष्करी प्रशिक्षण अनिवार्य असल्याने त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेमाची अनोखी भावना पाहायला मिळते. या प्रशिक्षणासाठी दोन वर्षांहून अधिक कालावधी लागतो. या कालावधीमध्ये त्यांना गोपनीय संपर्क साधण्याचं तंत्र, तंत्रज्ञानाचा वापर, संवाद साधण्याची कला, इस्त्रायलसह विविध देशांच्या लष्कराविषयी सखोल माहिती, शस्त्रास्त्रांविषयी माहिती आदी विषयांबद्दल दोन वर्षांमध्ये प्रशिक्षण दिलं जातं.

गुप्तचर यंत्रणेचं कार्य गुप्तपणे चालणं अत्यावश्यक असतं, त्यामुळे हे कार्य, त्यांच्या हालचाली संरक्षित असतात. प्रत्येक मोसाद अधिकार्याला अरबी भाषा उत्कृष्टरित्या बोलता येणं आवश्यक असतं. त्याशिवाय आणखी एक विदेशी भाषाही त्याला बोलता यायला हवी. या भाषाही त्यांना या काळामध्ये शिकवल्या जातात. त्यांना विविध माध्यमांचा वापर करून एखाद्यावर नजर ठेवणं, पाठलाग करणं, याचं प्रशिक्षण दिलं जातं. हे सगळं प्रशिक्षण त्यांना विविध पातळ्यांवर, विविध ऑपरेशन्समध्ये मदत करतं.

भारतालाही शिकण्यासारखं अर्थात, इस्त्रायलची गुप्तचर यंत्रणा किती श्रेष्ठ आहे याबद्दल फक्त कौतुक करणं हा उद्देश इथे नाही. इस्त्रायलच्या गुप्तचर यंत्रणेकडून भारताला शिकण्यासारखं बरंच काही आहे. कारण प्रेरित झालेली माणसं कायम लहान–मोठ्या घटनांमधून शिकत राहतात आणि स्वत:त आजूबाजूला बदल घडवतात. इस्त्रायलने केलेल्या विविध ऑपरेशनचा अभ्यास करून आपण भारतीय गुप्तहेरची कार्यपद्धती सुधारली पाहिजे. त्यामधून जर आपल्या गुप्तचर यंत्रणांना, या क्षेत्रामध्ये करिअर करू इच्छिणार्यांना काही शिकता आलं तर भारताचे भविष्य अधिक सुरक्षित होऊ शकतं. गुप्तचर यंत्रणेमध्ये भारतीय नागरिकांना सामील करून घेण्यासाठी आपण बरोबर पद्धती वापरत आहोत का? गुप्तचर यंत्रणेला मदत म्हणून विविध क्षेत्रांतल्या व्यक्तींचा उपयोग कितपत केला जातो? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपण भारतीय म्हणून सजगपणे शोधायला हवी आणि ती उघडपणे विचारायला हवीत, तरच या संपूर्ण यंत्रणेचे डोळे उघडायला मदत होऊ शकते.

# लोकशाही जीवंत हिच राष्ट्रीय एकात्मता !!

देशात दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने २०१४ मध्ये अधिकृतपणे 'राष्ट्रीय एकात्मता दिवसा'ची घोषणा केली. भारताच्या राजकीय एकात्मतेत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या भारताचे माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांचा भारतातील विविध समुदायांच्या एकतेवर दृढ विश्वास होता. स्वातंत्र्यानंतर संस्थानांना भारतीय संघराज्यात समाकलित करण्याचे आव्हानात्मक कार्य त्यांनी पेलले. या राज्यांना सामील होण्यासाठी त्यांच्या मुत्सद्दी कौशल्ये आणि मुत्सद्देगिरीने महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामुळे देशाची प्रादेशिक अखंडता सुनिश्चित झाली. अखेर पटेल यांच्या अथक प्रयत्नांनी अखंड आणि सामंजस्यपूर्ण भारताचा पाया घातला. ५५० हून अधिक संस्थानांचे देशात विलीनीकरण करण्याच्या त्यांच्या अतुलनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी हा दिवस 'राष्ट्रीय एकता दिवस' किंवा 'राष्ट्रीय एकात्मता दिवस' म्हणून साजरा केला जातो.

भारतासारख्या वैविध्यतेने परिपूर्ण अशा देशात तेथील लोकांमधील एकता अत्यंत महत्त्वाची आहे. ज्यावेळी अनेक संस्थानांचे तुकडे झाले होते, त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी अखंड भारताच्या संकल्पनेचे समर्थन केले. त्यामुळे हा दिवस वल्लभभाई पटेल आणि इतर कार्यकर्त्यांनी देशाला जोडण्यासाठी केलेल्या संघर्ष आणि बलिदानाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. विविधतेत एकता च्या भावनेला प्रोत्साहन देऊन राष्ट्रीय अखंडता राखण्याला महत्त्व देणारा हा दिवस आहे. अखंड आणि सशक्त भारताचे कट्टर समर्थक असणार्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याच्या सन्मानार्थ हा दिवस त्यांचा वाढदिवसाचे अवचित्य साधून 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून भारत सरकारने जाहीर केला. भारताच्या गृह मंत्रालयाने राष्ट्रीय एकता दिवसासाठी दिलेल्या अधिकृत निवेदनात असे नमूद केले आहे की राष्ट्रीय एकता दिवस एकता, अखंडतेसाठी आणि संभाव्य धोक्यांना तोंड देण्यासाठी आपल्या देशाच्या अंतर्निहित शक्ती आणि लवचिकतेची पुन्हा पुष्टी करण्याची संधी देईल. आपल्या देशाची सुरक्षा. त्या दिवशी, सरकारी कार्यालयांमध्ये एक प्रतिज्ञा वाचली जाते.

मी शपथ घेतो की, मी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्यासाठी स्वत:ला समर्पित करीन आणि माझ्या देशबांधवांमध्ये हा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करेन. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दूरदृष्टी आणि कृतीमुळे शक्य झालेल्या माझ्या देशाच्या एकीकरणाच्या भावनेने मी ही शपथ घेत आहे. मी माझ्या देशाची अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी माझे स्वतः चे योगदान देण्याचा संकल्प करतो. इंदिरा गांधी यांच्या हत्येचा दिवस म्हणून ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय संकल्प दिवस किंवा राष्ट्रीय प्रतिज्ञा दिन म्हणूनही साजरा केला जातो. अनेक शाळा आणि महाविद्यालये, विशेषत: काँग्रेस संचालित राज्यांमध्ये, इंदिरा गांधींच्या स्मरणार्थ रॅली आणि कार्यक्रम आयोजित करतात. २०१८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील नर्मदा नदीजवळ स्थित भव्य स्टॅच्यू ऑफ युनिटीचे उद्घाटन केले. एक भारत, श्रेष्ठ भारत ही पटेल यांची प्रसिद्ध घोषणा आजही राष्ट्राला प्रेरणा देते.

आयर्न मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे जगप्रसिद्ध नाव म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल. अनेक भारतीय संस्थानांचे देशात विलीनीकरण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ज्यामध्ये हैदराबादसह इतर संस्थानांचाही समावेश आहे. सरदार वल्लभभाई पटेल हे केवळ स्वातंत्र्यसैनिकच नव्हते तर दूरदृष्टी असलेले नेतेही होते. ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमध्ये जन्मलेले पटेल हे एक समर्पित वकील होते. ते सदैव न्याय, समता आणि एकता यांच्या बाजूने उभे राहिले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतही त्यांचे योगदान होते. कारण त्यांनी संविधान सभेचे प्रमुख सदस्य म्हणून काम केले आणि संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी जबाबदार असलेल्या समितीचे अध्यक्षपदही भूषवले होते. सर्वांना आज त्यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता दिना' च्या हार्दिक शुभेच्छा.

**********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# मुंबईत आर्य समाजाची स्थापनाकर्ते!

स्वामी दयानंद सरस्वती हे एका युगपुरूषाचे नाव आहे. एकोणीसाव्या शतकातली ती एक महान व्यक्ती नव्हे, शक्ती होती. ते एक महान धर्मसुधारक व समाजसुधारक होते. अंधारात सापडलेल्या व दिशा हरवून बसलेल्या समाजाला व देशाला आधार असतो तो केवळ समोरच्या क्षीतिजावर चमकणाऱ्या ध्रुवताऱ्याचा. स्वामी दयानंद सरस्वतींनी धर्मसुधारणेच्या कार्याची प्रेरणा बायो समाजाकडून घेतली होती. प्रारंभीच्या काळात त्यांच्या सहकार्यानेच धर्मप्रचाराचे व धर्मानुधारणेचे कार्य करीत. तथापि पुढे त्यांनी आपला वेगळा संप्रदाय निर्माण करण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी मुंबई येथे दि.१० एप्रिल १८७५ रोजी आर्य समाजाची स्थापना केली. श्री एन. के. कुमार जी. गुरुजींचा सदर ज्ञानवर्धक लेख... संपादक.

आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक सुधारणांबरोबरच शैक्षणिक सुधारणा केल्या. वेदांचे शिक्षण घेणारा तरुण हा निर्भय, तेजस्वी आणि काळाचे आव्हान स्वीकारणारा केव्हा होईल? असे स्वानी दयानंदाना वाटत होते. उत्तर भारतात त्यांनी चालविलेले चोक्षण प्रसाद कार्य अतिशय महत्वपूर्ण ठरले. समाजाच्या सर्व घटकाना एका सूत्रामध्ये बांधण्याकरिता समान भाषा आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान मिळावे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. स्वामीजींनी ख्रिस्ती आणि मुसलमान धर्मात गेलेल्या लोकांचे शुद्धीकरण करून त्यांना हिंदू केले. महर्षी दयानंदांचा जन्म गुजरातमधील टंकारा या गावी दि.१२ फेब्रुवारी १८२४ रोजी झाला. त्यांचे मूळनाव मूळशंकर अंबाशंकर तिवारी होते. त्यांचे आई–वडील औदिच्य ब्राह्मण होते. समाजात त्यांना सन्मानाचे स्थान होते. घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. घराण्यात ज्ञानाची परंपरा होती. मूळशंकर हा कुशाग्र बुद्धीचा संवेदनशील मुलगा होता. वयाच्या चौदाव्या वर्षी यजुर्वेद त्यांना पूर्ण कंठस्थ होता. तीन प्रसंग असे घडले की त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ झाले. पहिला प्रसंग शिवरात्रीच्या दिवशी घडला. शिवमंदिरात व्रत, उपवास करत असता रात्रीच्या सामसूम झालेल्या क्षणी शिवपिंडीवर उंदीर चढला. त्याचा कुठलाच प्रतिकार पिंडीकडून होत नव्हता. वडिलांकडून भगवान शिवाबद्दल बरेच ऐकले होते, तसे होताना दिसले नाही. दुसरे, बहिणीचा मृत्यू व तिसरा प्रसंग चुलत्याचा मृत्यू होय. या प्रसंगांनी खुप दु:ख झाले. मलाही असेच मरण येईल का? मृत्यू काय आहे? तेही जाणणे आवश्यक वाटून मूलशंकरने एके दिवशी गृहत्याग केला व ते पुन्हा कधी घरी परतले नाही. लग्नाच्या बेडीतही अडकले नाही.

एकदा शिवरात्री होती. वडील म्हणाले, मूलशंकर, आज सर्वांनी उपवास करायचा. रात्रभर देवळात जागायचे आणि शंकराच्या पिंडीची पूजा करायची. हे ऐकून मूलशंकरने उपवास केला. दिवस संपला, रात्र झाली. मूलशंकर आणि वडील शंकराच्या देवळात गेले. त्यांनी पूजा केली, पिंडीवर फुले वाहिले. तांदळाच्या अक्षता वाहिल्या. रात्रीचे बारा वाजले. वडिलांना झोप येऊ लागली, पण मूलशंकर जागे राहिले. आपला उपवास निष्फळ होईल, या भीतीने ते झोपले नाही. देवळातल्या बिळांतून उंदीर बाहेर आले आणि शंकराच्या पिंडीभोवती फिरू लागले. ते पिंडीवरच्या अक्षता खाऊ लागले. हे दृश्य पाहून जी मूर्ती उंदरापासून स्वतः चे रक्षण करू शकत नाही, ती भक्तांचे संकटापासून रक्षण कशी काय करू शकेल? मूर्तीत काहीही सामर्थ्य नसते; तेव्हा मूर्तिपूजेलाही काही अर्थ नाही. अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. त्या वेळेपासून त्यांच्या मनात धर्माविषयी जिज्ञासा जागृत झाली. परमेश्वराचे शाश्वत स्वरूप व धर्माचा खरा अर्थ जाणून घेण्याची ओढ त्यांना लागली. इ.स १८५७च्या असफलतेपासून तर काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत भारतीयांच्या हृदयामध्ये स्वातंत्र्यप्रेम जागृत ठेवण्याचे कार्य ज्या ज्या महापुरुषांनी केले, त्यापैकी स्वामी दयानंद हे एक होते. भारतात ब्रिटिशांना हाकलण्याकरिता सशस्त्रक्रांती हा एकमेव मार्ग आहे, अशी त्यांची पक्की खात्री होती. आर्यसमाज आणि गुरुकुल यांमध्ये राष्ट्रभक्ताना सशस्त्र क्रांतीकरिता प्रेरणा आणि प्रशिक्षण मिळत असे. स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय आणि लाला हरदयाल आदी ब्रिटिशांना भारतातून हाकलण्याकरिता उघडपणे लढणारे नेते आर्यसमाजीच होते.

एकदा टंकारा नगरामध्ये कॉलराची साथ आली. त्या साथीमध्ये मूलशंकरची चौदा वर्षांची बहीण मरण पावली. या घटनेनंतर तीन वर्षांनी मूलशंकरच्या आवडत्या काकांचाही कॉलरामुळे मृत्यू झाला. मूलशंकरला याचा जबरदस्त धक्का बसला, जणू काही त्यांचे जीवन सर्वस्वच हरवले! कौटुंबिक बंधनाचा त्याग करावा, अशी मूलशंकरच्या मनात इच्छा निर्माण झाली. जीवन काय आहे? मृत्यू काय आहे? या प्रश्नांची उत्तरे सुयोग्य महात्म्याकडून समजवून घ्यावीत, असे त्यांना वाटत होते. या ध्येय प्राप्तीकरिता वयाच्या २१व्या वर्षीच त्यांनी घरदार सोडले. त्यांच्या घरातील वडीलधाऱ्या मंडळींनी त्यांच्या लग्नाचा चालविलेला विचार, हे त्यांच्या निर्णयास निमित्त झाले होते. भौतिक सुखाचा आनंद लुटण्यापेक्षा स्वतःची आध्यात्मिक उन्नती करून घेणे, त्यांना अधिक महत्त्वाचे वाटले. त्यासाठी घरादाराचा त्याग करून गुरूचा शोध घेत फिरण्याचा निर्णय त्यांनी घेतला. गृहत्याग केल्यानंतर मूलशंकर अहमदाबाद, बडौदा, हरिद्वार, काशी, कानपूर या ठिकाणी गुरूच्या शोधार्थ जंगलातून व पहाडातूनसुद्धा प्रवास करीत राहिले, परंतु त्यांना योग्य गुरू मिळाला नाही. याच सुमारास त्याकाळचे प्रकांड पंडित आणि संन्यासी स्वामी पूर्णानंद यांची मूलशंकरशी भेट झाली. त्यांचे शिष्यत्व पत्करून मूळशंकरांनी संन्यास धर्माचा स्वीकार केला. संन्यास धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी स्वामी दयानंद सरस्वती हे नाव धारण केले. पंधरा वर्षापर्यंत सर्वत्र भ्रमंती केल्यावर स्वामी पूर्ण शर्मा नामक साधूच्या म्हणण्यानुसार स्वामी दयानंद मधुरेस येऊन पोहोचले. त्या ठिकाणी त्यांनी स्वामी विरजानंद यांचे शिष्यत्व पत्करून त्यांच्याकडूनच वेद व इतर हिंदू धर्मग्रंथाचे ज्ञान घेतले. स्वामीजींना वेद सर्वश्रेष्ठ आणि पवित्र वाटत होते. मुख्य म्हणजे वेदांमध्ये मूर्तिपूजा नव्हती की उच्चनीच हा भाव नव्हता. वेदातील ज्ञान हे खरेखुरे ईश्वरीय ज्ञान आहे; पवित्र ज्ञान आहे. ते समाजाकरिता अत्यंत उपयुक्त आहे. अशी दयानंदांची अदा होती. म्हणूनच त्यानी वेदाकडे परत जा अशी भारतीयांना शिकवण दिली. आपल्या अस्खलित प्रवचनाद्वारे ते मूर्तिपूजा, जन्मजात उच्च–निचता, जातिभेद, जाचक रूढी, यज्ञांमध्ये केली जाणारी पशुहत्या यांच्यावर घणाघाती आघात करू लागले. इ.स. १८६९मध्ये त्यांनी काशीच्या सनातनी ब्राह्मण पंडिताशी शास्त्रार्थावर वादविवाद केला, त्यामुळे त्यांचे नाव सर्वत्र गाजले.

सत्यार्थ प्रकाश हा महान ग्रंथ म्हणजे स्वामी दयानंदांनी आपल्या समाजाला दिलेली अनमोल देणगी होय. या ग्रंथामध्ये पंधरा अध्याय असून त्यामध्ये वेदांचा सत्यार्थ दिलेला आहे. म्हणून या ग्रंथाला सत्यार्थ प्रकाश म्हटले आहे. हा ग्रंथ पूर्णपणे वेदांवर आधारलेला आहे. वेद भाष्य, संस्कार निधी, व्यवहार भानू इत्यादी ग्रंथसुद्धा त्यांनी लिहिले. सर्व मानव एक, सर्वांचा देव एक, सर्वांचा धर्म एक, पृथ्वी माता एक, हीच जीवनाची चतुःसूत्री आहे. स्त्रियांना शिक्षण दिले जात नाही, त्यांना अज्ञानात ठेवले जाते. हे भारताच्या अध:पतनाचे एक कारण आहे. ज्याप्रमाणे गाठोड्यात असलेल्या रत्नांचे प्रतिबिंब आरशात पडू शकत नाही, त्याप्रमाणे जोपर्यंत स्त्रिया पडदा पद्धतीसारख्या मूर्ख रुढीचे बंधन तोडत नाहीत तोपर्यंत त्यांची प्रगती होणे अशक्य आहे. त्यांनी हा पडदा फेकून दिला पाहिजे. सीता आणि सावित्री चिरस्मरणीय झाल्या. ते त्यांच्या सद्गुणांमुळे, त्यांच्या पडद्यामुळे नाही. स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे. स्त्री ही कुटुंबाची स्वामिनी असल्याने तिला तिचे अधिकार मिळाले पाहिजेत. हे त्यांचे विचार आजही प्रेरक वाटतात. अशा या महान युगपुरुषांनी दि.३० ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून अनंतात विलीन झाले. !! त्यांचे पुण्यस्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन !!

**************

श्री एन. के. कुमार जी. गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप–
९४२३७१४८८३.

# दीपोत्सव गोड व्हावा

वसुबारसेपासून दिव्याच्या सणाला म्हणजेच दिवाळीला प्रारंभ झाला आहे. आजच्या धनत्रयोदशीपासून या दीपोत्सवाचा मुख्य काळ सुरू होत आहे. नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज अशी चार स्वतंत्र दिवसांची दिवाळी यंदा होत आहे. त्यासाठी मागच्या आठवड्यात बाजारात झालेली ग्राहकांची तुडुंब गर्दी आपण सगळ्यांनीच अनुभवली आहे. समस्या आणि अडचणी कितीही असल्या तरी सण गोड करण्याची आपली पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. तीच परंपरा यंदा सर्वजण पाळताना दिसतात. साधारण पंधरा–वीस दिवस आधीपासून दिवाळीची खरेदी सुरू होते, पण यावेळी मात्र प्रत्यक्ष दिवाळीला सुरुवात व्हायच्या जेमतेम आठवडाभर आधी बाजारात लगबग दिसली. अन्यथा यंदाचाही मामला तसा थंडाच होता. सर्वसामान्य माणसांपुढे आज असंख्य अडचणी आहेत. त्या अडचणीतून मार्ग काढत चार दिवस घरातील वातावरण आनंदी ठेवण्याचा प्रयत्न सर्वच जण आपापल्या क्षमतेने करतात. परंतु हे करताना देखील सर्वसामान्यांची दमछाक व्हावी अशी बाजारातील एकंदर परिस्थिती आहे. दिवाळी म्हणजे रोषणाई आणि रोषणाई म्हणजे विजेचा वापर हा मुद्दा जर लक्षात घेतला तरी यंदा महाराष्ट्राची दिवाळी देशातील सर्वाधिक महागडी दिवाळी ठरणार असल्याची आकडेवारी नुकतीच प्रकाशित झाली आहे. कारण महाराष्ट्रातील विजेचे दर हे सर्वाधिक आहेत. सर्वसामान्य माणूस महागाईने बेजार झाला आहे ही रोजचीच रड असली तरी खर्चाची बाजू थोडी पुढे मागे करून माणूस वेळ मारून नेतो आणि दिवाळीसारखा मोठा सण शक्य तितक्या आनंदी वातावरणात जावा यासाठी प्रयत्नशील असतो. दिवाळीला सराफ बाजारात मोठी धांदल पाहायला मिळते. पण सोन्याचे ८० हजार रुपयांच्या पुढे जाणारे भाव लक्षात घेतले तर सर्वसामान्य माणसांना सराफ बाजारात फारसे स्वारस्य उरले असेल असे वाटत नाही. फराळाचे जिन्नसही महागले आहेत. कपडे खरेदी, इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी, घराचे रंगकाम अशी सगळी कामे दिवाळीत होतात. पण तेथेही लोकांना सावधगिरीनेच खर्च करावा लागताना दिसतोय. लोकांकडे अतिरिक्त खर्च करण्यासाठीचा पैसा आता शिल्लक राहताना दिसत नाही अशी सार्वत्रिक ओरड आहे. बँकांमधील बचत खात्याची रक्कम दिवसेंदिवस घटत आहे, सोने गहाण ठेवून कर्ज काढण्याची वेळ अनेकांवर आली आहे, नोकरदारांसाठी पगारवाढीला अनुकूल वातावरण नाही, शेतकरी आणि शेतमजुरांचे हाल तर न बोललेलेच बरे अशा स्थितीत गेले आहेत. आजही ग्रामीण भागातील अनेक जण 'मनरेगा' योजनेच्या रोजगार उत्पन्नावर अवलंबून आहेत. पण मनरेगा योजनेतील रोजगारही



दिवसेंदिवस घटताना दिसतो आहे. चालू आर्थिक वर्षात मनरेगा योजनेतील सुमारे ४० लाख कामगारांना कामावरून काढले गेले आहे. मागील दोन आर्थिक वर्षांमध्ये तब्बल आठ कोटी लोकांना मनरेगा रजिस्ट्रीमधून काढून टाकण्यात आल्याची माहिती एका अहवालात मिळाली आहे. इतक्या मोठ्या संख्येने कामगार कपातीमागे काही तांत्रिक अडचणी असतील असे जरी क्षणभर मानले तरी ज्याला काम मिळाले आहे त्यांना तरी वेळेवर वेतनाची कोणतीही हमी उरलेली नाही ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येत नाही. अशा स्थितीत ग्रामीण भागातील मजूर कोणत्या उत्साहाने दिवाळी साजरी करू शकणार आहे, हा प्रश्न आहे. शेतकर्यांची पिकांच्या चांगल्या भावाची हमीही आता उरलेली नाही. सरकारकडून शेतमालासाठी वाढीव हमीभाव काही प्रमाणात जाहीर केले जात असले तरी, त्या भावात सरकारी खरेदी मोठ्या प्रमाणावर होत नाही. त्यामुळे शेतकर्यांच्या अडचणीही कमी होताना दिसत नाहीत. शेतकरी, शेतमजूर आणि असंघटित कामगारांच्या तुलनेत सरकारी कर्मचारी, बँका, वित्तीय सेवा कंपन्या, औद्योगिक कंपन्या या संघटित क्षेत्रातील नोकरदार वर्गांची परिस्थिती तुलनेने बरी आहे; पण अशा संघटित क्षेत्रातील कर्मचार्यांची संख्या देशातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अगदी अल्प आहे. त्यामुळे ही दिवाळी सर्वांनाच समान आनंदात साजरी करता येईल अशी परिस्थिती नाही. शेवटी माणूस आशेवर जगत असतो. आज ना उद्या परिस्थिती सुधारेल अशा उमेदीत तो असतो. त्याच आशेवर दिवाळीचा सण साजरा करणार्यांची संख्या अधिक आहे.

महाराष्ट्रात राज्य सरकारने निवडणुकीच्या तोंडावर लोकांना दिलासा वाटेल अशा काही योजना जाहीर केल्या. त्यात लाडकी बहीण, लाडका भाऊ वगैरे योजनांचा समावेश आहे. लाडक्या बहिणीचे दर महिन्याचे पंधराशे रुपये खात्यावर जमा झाले हाच काय तो महिला वर्गाला मिळालेला दिलासा आहे. लाडक्या भावांसाठी जी अप्रेंटिस उपयोजना जाहीर केली आहे त्याची अंमलबजावणी नेमक्या कोणत्या स्थितीत आहे आणि नेमक्या किती जणांना त्यातून रोजगार मिळाला आहे हे अजून नेमकेपणाने समोर आलेले नाही. राज्य शासनाने सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची देणी थकवल्याची माहिती अलीकडेच प्रकाशित झाली होती. त्या लोकांच्या दिवाळीचे काय हा प्रश्न आहेच. एसटी कर्मचार्यांचे पगारही थकीत होते म्हणतात. पण त्यांच्या पगारासाठी साडेतीनशे कोटी रुपयांची तरतूद झाल्याची बातमीही आली आहे. त्यामुळे त्यांनाही थोडा दिलासा मिळालेला आहे. पण निवडणुकीनंतरचा काळ अधिक खडतर असेल. सरकारी तिजोरीतील खडखडाट शेवटी सर्वसामान्यांनाच भोगावा लागणार आहे. राजकारणी निवडणुकीच्या काळात तोंड भरून आश्वासने देतात पण त्यावर आता विसंबून राहण्याचा काळ संपला आहे. लोकांचे जीवनमान सुकर व्हावे याची फिकीर राज्यकर्ते कधी करणार हा मुख्य प्रश्न आहे. निवडणूक प्रचार काळातील बातम्या आणि पक्षांतरे पाहिल्यानंतर या लोकांना स्वतः च्या राजकीय हितापेक्षा सर्वसामान्यांच्या हिताबाबत किती काळजी आहे याची चिंता अधिक गडद होत जाताना दिसते. सण गोड करण्याची आपली परंपरा इमानेइतबारे जपणार्या या सर्वसामान्यांच्या आयुष्यात खर्या अर्थाने गोडवा निर्माण होण्याची गरज आहे. तशी परिस्थिती येणार्या भविष्यकाळात निर्माण होवो अशी अपेक्षा आपण व्यक्त करूयात आणि हा मांगल्याचा सण आपण उत्साहाने साजरा करूयात.

# विजकुमार वाव्हळ यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### मनोज जरांगे पाटील राजकारणात प्रवेश मराठा आंदोलनाला नवा राजकीय चेहरा

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यभरात चर्चेत असलेले मनोज जरांगे पाटील आता सक्रिय राजकारणात प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे राज्यात त्यांनी मोठा जनाधार मिळवला आहे. जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिला आहे, आणि त्यांच्या या लढ्याला अनेक युवक आणि मराठा समाजाचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

जरांगे पाटील यांच्या राजकारणात प्रवेशामुळे मराठा समाजाला एक नवीन, तडफदार नेतृत्व मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्या लोकप्रियतेमुळे तरुण वर्ग आणि मराठा समाज त्यांना पाठिंबा देत आहेत, ज्यामुळे राज्यातील पारंपरिक राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीने चांगलाच रंग धरला आहे. इच्छुकांच्या गर्दीने विधानसभेचे राजकीय वातावरण चांगले तापले आहे. यंदाच्या निवडणुकीत केवळ जरांगे फॅक्टर चालणार असुन त्याचा परिणाम पुर्ण राज्यात पहायला मिळत आहे. जरांगे पाटलांनी शेवटच्या क्षणापर्यंत आपला गनिमी कावा अजुन तरी स्पष्ट केलेला नाही. यामुळे रणनिती आखण्यास प्रस्थापिक सत्ताधारी, विरोधी पक्षांना घाम फुटला आहे. तर रणनिती नेमकी काय असावी याचा मेळ बसताना दिसत नाही. जरांगे पाटलांच्या सुचनेवरून मराठा आरक्षणाला समर्थन देणार्या सर्व इच्छुक उमेदवारांना विधानसभेचे अर्ज भरण्यास सांगितले आहे. यातील कुठला अर्ज ठेवायचा, कुणाला उमेदवारी द्यायची हे येत्या ३० ऑक्टोबर पर्यंत स्पष्ट होणार आहे. यावरून केज विधानसभा मतदार संघात राखीव जागेवर आज उद्योजक तथा संपादक विजयकुमार वाव्हळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी मनोज दादा जरांगे पाटील समर्थक यांची मोठया प्रमाणावर उपस्थिती होती. यावेळी समर्थकांची गर्दी जमा करून जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला.उमेदवारी अर्ज दाखल करताना विजयकुमार वाव्हळ यांनी आपल्या कार्यकाळात केज मतदारसंघातील विकासकामांना गती देण्याचे वचन दिले. मराठा आरक्षण, सगे सोयर्यांची अंमलबजावणी, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यासारख्या मुद्द्यांवर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी मनोज जरांगे पाटलांचे खंदे समर्थक ऋषीकेश बेदरे, प्रभाकर थोरात, चव्हाण साहेब, भाऊसाहेब निंबाळकर आदींची उपस्थिती होती. याबाबत अधिक असे की, बीड जिल्ह्यातील केज मतदारसंघात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. आज केज मतदारसंघासाठी प्रमुख पक्षांचे उमेदवार आणि स्वतंत्र उमेदवारांनी मोठ्या जल्लोषात आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केले. या उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत स्थानिक राजकीय वातावरण चांगलेच तापलेले दिसत आहे. जरांगे पाटलांच्या सुचनेवरून आज केज विधानसभा मतदार संघात राखीव जागेवर आज उद्योजक तथा संपादक विजयकुमार वाव्हळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी मनोज दादा जरांगे पाटील समर्थक यांची मोठया प्रमाणावर उपस्थिती होती. आज तहसील कार्यालयात मोठ्या प्रमाणावर समर्थकांसह उपस्थित राहून विजयकुमार वाव्हळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरताना त्यांनी आपल्या मतदारसंघातील विकासकामांचे वचन दिले, तसेच भविष्यातील योजनांची माहिती देऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. मराठा आरक्षणासाठी असणार कटीबध्द : केज-अंबाजोगाई



मतदार संघातील जनतेने एकदा संधी द्यावी या संधीचे सोने करत मनोज दादांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वाटचाल करून, मराठा आरक्षणासाठी पुर्ण समर्थन असुन कायद्याच्या रक्षणासाठी पुढे येवू, सगे सोयर्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्नशील राहु, मराठा, मुस्लिम, दलित समाजाच्या हक्कासाठी कटीबध्द आहोत. नवोदितांना संधी : यंदाच्या निवडणुकीत मनोज दादा जरांगे पाटलांच्या यांच्या सुचनेनुसार काही नवोदित उमेदवारांना संधी मिळत असल्याचा आनंद यावेळीं त्यांनी व्यक्त केला. आज पर्यंत केवळ प्रस्थापित नेत्यांनी आपल्या सोयीचे राजकारण केले. गोर गरीब, गरजवंतांचा केवळ वोट बँक म्हणून वापर केला. परंतु आता यंदाच्या निवडणुकीत आमच्या सारख्या नवोदितांना संधी दिल्याबद्दल वाव्हळ यांनी जरांगे पाटलांचे आभार मानले आहेत. कार्यकर्त्यांचे उत्साह: उमेदवारी अर्ज दाखल करताना विजयकुमार वाव्हळ यांच्या कार्यकर्त्यांनी व मराठा योध्दा मनोज जरांगे पाटलांच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये नवीन उत्साह संचारला असल्याचे दिसुन आले.

केज मतदारसंघातील प्रमुख पक्षांनी या निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांचे नाव निश्चित करून अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. परंतु त्यांच्या विजयात मोठा असणार्या मराठा समाजाला आरक्षणापासुन वंचित ठेवले असल्याने मागील दीड वर्षापासून चालु असलेल्या मनोज दादा जरांगे पाटलांच्या उपोषणाची दखल न घेतल्याने तालुक्यातील मराठा सत्ताधारी उमेदवारावर प्रचंड नाराज आहे. पाटलांच्या सुचनेनुसार आता पाटलांनी आपले शिलेदार मैदानात उतरवण्याचे ठरवले. यावरून सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाच्या उमेदवारांत चिंतेचे वातावरण पसरल आहे. सत्ताधारी पक्षाचे उमेदवार विकासाच्या वचनांसह अर्ज दाखल करताना दिसले, तर विरोधी पक्षाच्या उमेदवारांनी सत्ताधार्यांच्या अपयशावर निशाणा साधला आहे. अर्ज दाखल केल्यानंतर आता अर्जांची तपासणी होणार असून, अधिकृत उमेदवारांची यादी लवकरच प्रसिद्ध होईल. केज मतदारसंघातील ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे, कारण प्रत्येक उमेदवाराने आपल्या समर्थकांसह मोठे शक्तिप्रदर्शन केले आहे. जरांगे पाटील यांचे आंदोलन आणि समाजासाठीचा त्यांचा त्याग पाहता, त्यांना मराठा समाजासह इतर वर्गांचाही पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या राजकीय भूमिकेमुळे राज्यातील राजकारणात नव्या घडामोडी होण्याची शक्यता आहे. यावरून त्यांनी आता आपले शिलेदार उभे करण्याच्या सुचना केल्यामुळे प्रस्थापितांच्या पायाखालची वाळु सरकली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, ७ मोटरसायकल जप्त. ०४ आरोपी अटक

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, ७ मोटरसायकल जप्त. ०४ आरोपी अटक

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २८/१०/२०२४ रोजी पथकाला माहिती मिळाली की, औसा तालुक्यातील भादा येथे मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील गुन्हेगार त्यांनी चोरलेल्या मोटरसायकली घरासमोर लपउन ठेवल्या आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक २८/१०/२०२४ रोजी सदर पथक भादा येथे पोचून एका घरासमोर मोटार सायकलसह थांबलेल्या दोन इसमाना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव १) शाहरुख प्यारमहम्मद पठाण, वय २६ वर्ष, राहणार भादा तालुका औसा. २) शफिक हामजू पिरजादे, वय ३० वर्ष, राहणार आनंदनगर, भादा तालुका औसा. असे असल्याचे सांगितले.




तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या सात मोटार सायकल संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरच्या मोटरसायकली ह्या लातूर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरी केले आहेत.

नमूद आरोपीकडून चोरीच्या सात मोटारसायकली ज्याची एकूण किंमत १ लाख ३५ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस ठाणे गांधी चौक येथील मोटरसायकल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले असून पोलीस ठाणे शिवाजीनगर व एमआयडीसी येथील प्रत्येकी एक मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आले असून उर्वरित तीन मोटार सायकल बाबत तपास सुरू आहे.

तसेच ताब्यातील नमूद आरोपींताकडे सखोल तपास केला असता त्यांनी आणखीन काही मोटारसायकली चोरी करून भंगार दुकानदार नामे १) लालडेसाब अब्दुलरजाक मणियारी, वय ५१ वर्ष राहणार नवी पेठ औसा जिल्हा लातूर. २) सादिक अलीम टेंबीकर, वय ३२ वर्ष, राहणार समुद्रवाणी तालुका धाराशिव (उस्मानाबाद) यांच्याकडे दिल्याचे सांगितले.

त्यावरून नमूद भंगार दुकानदारांना ताब्यात घेऊन तपास केला असता त्यांनी नमूद आरोपीताकडून घेतलेल्या मोटारसायकली चे पार्ट वेगळे करून भंगार मध्ये विक्री केल्याचे सांगितले आरोपी नामे सादिक टेंबीकर याचे कडून चोरलेल्या मोटारसायकलचा चेसी व इंजिनचा काही भाग हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रमाणे नमूद आरोपी त्यांनी एकूण दहा मोटारसायकली चोरल्या असून त्यापैकी सात मोटारसायकल जप्त करण्यात आले असून तीन मोटार सायकल चे पार्ट वेगवेगळे करून इतरत्र विक्री केल्याचे निष्पन्न होत असून एकूण एक लाख पन्नास हजार रुपये किमतीचे सात मोटारसायकल व एका मोटरसायकलचे पार्ट जप्त करण्यात आले असून एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नमूद मुद्देमाल व आरोपींना पोलीस ठाणे गांधी चौक येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार सूर्यकांत कलमे, रामहरी भोसले, योगेश गायकवाड,तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले, प्रदीप चोपणे यांनी पार पाडली.

## फक्त ७४ सेकंदात पूर्ण होतो प्रवास! जगातील सर्वात लहान विमान प्रवासाबद्दल माहिती आहे का?

विमानातून प्रवास करणे हे प्रत्येक सामान्याचे स्वप्न असते. आयुष्यात एकदा तरी विमानाने प्रवास करावा असे प्रत्येकाला वाटत असते. मात्र विमानाचा प्रवास महाग असल्याने अनेकजण विमान प्रवासाकडे दुर्लक्ष करतात. मात्र आता प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी आजकाल विविध कंपन्या विमान प्रवासाकडे प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी विविध ऑफर्स देत आहेत. तसं पाहायला गेलं तर फ्लाइटचा प्रवास हा अधिकतर जास्त पल्ल्याच्या प्रवासातही केला जातो. याच्या मदतीने अनेक मोठमोठे प्रवास तुम्ही काही तासांतच पूर्ण करू शकता. मात्र आज आम्ही तुम्हाला विमानाच्या अशा एका प्रवासाबद्दल माहिती सांगत आहोत, जो फक्त ७४ सेकंदात पूर्ण होतो हा जगातील सर्वात लहान प्रवास म्हणून ओळखला जातो. चला तर याविषयी सविस्तर जाणून घेऊयात.

फक्त ७४ सेकंदाचा प्रवास आम्ही तुम्हाला आज अशा एक प्रवासाविषयी सांगत आहोत, जो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी फक्त ७४ सेकंदाचा अवधी घेतो. ही जगातील सर्वात लहान उड्डाण आहे, जी डेसरपरळी द्वारे चालवला जातो. स्कॉटलंडमधील वेस्ट्रे आणि पापा वेस्ट्रेच्या ऑर्कने बेटांदरम्यान हे फ्लाइट उडते. या अनोख्या स्कॉटिश फ्लाइटने आपला संपूर्ण प्रवास अवघ्या दीड मिनिटात पूर्ण केला. या फ्लाइटची माहिती समोर येताच ती सोशल मीडियावर एक चर्चेचा विषय बनली. चला याविषयी सविस्तर जाणून घेऊयात.

या फ्लाइटची माहिती सोशल मीडियावर शेअर करण्यात आली आहे.

# कुंभारांच्या पारंपरिक व्यवसायावर गदा





किनवट/शेख शौकत :- आजच्या काळात आमचा पारंपरिक व्यवसाय आता मागे पडत चालला आहे. त्यातच अत्याधुनिक चीनी लाइटिंग चिनी मातीच्या दिव्यांना मोठी मागणी वाढत आहे. त्यामुळे आमच्या पारंपरिक व्यवसायावर गदा आल्याचे कुंभार व्यवसाय करणाऱ्या किनवट शहरातील श्रीमती लक्ष्मीबाई भुमन्ना नगनुलवार यांनी सांगितले. शहरातील कुंभार गल्लीत राहणाऱ्या श्रीमती लक्ष्मीबाई यांनी वृत्तपत्र बोलताना सांगितले की, मी लग्न झाल्यापासून ५० ते ६० वर्षापासून आमचाच पारंपारिक व्यवसाय करीत आहे. पूर्वी आमच्या मातीच्या दिव्याला अधिक पसंद होती. घराघरात दिवाळीनिमित्त मोठ्या प्रमाणात मातीचे दिवे लावले जायचे. पण आता चीनी मातीच्या दिव्यांना व लाइटिंग मोठी मागणी आहे. त्यामुळे मातीपासून दिवे बनवण्याचा व्यवसाय आता लोप पावत आहे. आम्ही औरंगाबाद व इतर शहरातून ही चीनी मातीचे दिवे विकत आणतो व थोडया फार नफ्यावर ही दिवे विकून आमचा संसाराचा गाडा चालवतो. पूर्वी सर्वाधिक आमचा व्यवसाय चालत असे. पिण्याच्या पाण्यासाठी माठ, रांजण वापराऐवजी आता प्लास्टिकच्या टाक्या आल्या आहेत. सणा सुदीच्या काळातही चीनी वस्तू मोठया प्रमाणात विक्रीस आल्याने आमच्या व्यवसायावर गदा आली आहे परंपरा टिकून ठेवण्यासाठी सर्वसामान्य जनतेला समोर यावं लागेल. दीपावलीच्या वस्तू बनविण्यासाठी आम्ही तीन महिन्यांपासून राब राब राबत असतो. आता दिवस बदलले आहेत. त्यामुळे आमच्या नव्या येणाऱ्या पिढ्याचे पिढे काय होणार ही चिंता सतावत आहे.

## क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या रूपाने उदगीर मतदार संघात विकास पर्वाची सुरुवात - प्रदेश सरचिटणीस समीर शेख

उदगीर बाबासाहेब मादळे :- उदगीर जळकोट शहराबरोबर ग्रामीण भागातील गावासह वाडी तांड्यावर विकास निधी पोहोचून मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणारे विकासरत्न नामदार संजय बनसोडे हे उदगीर मतदार संघाला लाभलेले परिस असुन मागील २५ वर्षाचा बॅंकलॉग क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी भरुन काढून क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या रूपाने उदगीर मतदार संघात विकास पर्वाची सुरुवात झाली असल्याचे मत राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस समीर शेख यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील औरंगपुरा महेबुबपुरा येथील समाजबांधवांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, सनाउल्ला खाँन, समद शेख, इब्राहिम नाना, मजहर पटेल, ताजोदीन लदाफ, अतिख शेख, सलीम लदाफ, अकरम जागिरदार, खाजा पटेल, शेख खाजा, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना समीर शेख यांनी, उदगीर शहरात ईदगाह मैदानाच्या



जागेचा प्रश्न सोडवला, शामद खादरी दर्गासाठी ५० लक्ष, इदगाह मैदान संरक्षण भिंत १ कोटी, मौलाना अबुल कलाम प्रवेशव्दारासाठी ५० लक्ष शादीखाना बांधाकामासाठी ७.५० कोटी देवुन त्याचे काम अंतिम टप्पात असुन उदगीर शहरातील मुसानगर व दबीरपुरा येथील मुस्लिम बांधवांसाठी सभागृह मंजूर केले. भविष्यात उर्दू भवनची उभारणार होणार आहे. मुस्लिम समाजासाठी मार्टीची स्थापणा केली. यामुळे समाजातील लाखो विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. ना.बनसोडे यांनी उदगीर मतदार संघातील मुस्लिम बांधवांना मूलभूत गरजा पुरविल्या आहेत. त्यामुळे आपण सर्व समाज बांधवांनी उदगीरच्या विकासासाठी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभारण्याच्या आव्हान समीर शेख यांनी केले आहे. यावेळी मुस्लिम समाज बांधव व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुठलेही शक्तिप्रदर्शन न करता माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल

केज/प्रतिनिधी कुठलेही शक्तिप्रदर्शन न करता माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीच्या वतीने मंगळवार, दिनांक २९ ऑक्टोबर रोजी केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. २३२ केज विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार श्री.पृथ्वीराज शिवाजीराव साठे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी समवेत




राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या अंजलीताई घाडगे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख, संजीवनीताई देशमुख, सुरैय्या भाभी, सौ.जयश्री साठे, सौरभ सोनवणे, रघुनाथ कुचेकर हे प्रमुख नेते उपस्थित होते. केज विधानसभा मतदारसंघात माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी कुठले ही शक्तिप्रदर्शन केले नाही, तर अतिशय साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाविकास आघाडीच्या घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले. यावेळेस पृथ्वीराज साठे यांच्या नांवाची केज मतदारसंघात जोरदार चर्चा पहावयास मिळत आहे. महाविकास आघाडीची ताकद व मागील दहा वर्षांत माजी आमदार साठे यांनी ठेवलेला जनसंपर्क व या निवडणुकीत त्यांनी निर्माण केलेला हा माहोल जर शेवटपर्यंत कायम टिकून ठेवण्यात त्यांना यश आले. तर मग या निवडणुकीत माजी आमदार साठे यांचाच विजय होणार अशा प्रतिक्रिया जनतेतून ऐकायला येत आहेत. माजी आमदार साठे यांना भरभरून मिळत असलेला प्रतिसाद पाहून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून जनतेत त्यांची लोकप्रियता कायम असल्याचेच पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# नात्यात सुरू आहे 'घोस्टिंग', जोडीदार नक्की असे का वागतात, काय आहे अर्थ?

आजकाल डेटिंग आणि नातेसंबंधांच्या जगात सामान्यपणे पाहिले जाणारे वर्तन म्हणजे 'घोस्टिंग'. हा शब्द वाचून तुम्हाला थोडं घाबरल्यासारखं झालं असेल ना? घोस्टिंग म्हणजे एखाद्यावर काळी जादून करणे असं नाही तर याचा अर्थ कोणत्याही विशिष्ट कारणाशिवाय किंवा सांगितल्याशिवाय तुमच्या जोडीदाराशी अचानक संपर्क तोडणे किंवा त्यांना सर्वत्र ब्लॉक करणे. यामध्ये ज्या व्यक्तीने ब्लॉक केले आहे ती व्यक्ती आपल्या जोडीदाराच्या कॉल्सला उत्तर देत नाही किंवा मेसेज करत नाही किंवा कोणत्याही प्रकारचा संवाद सांभाळत नाही. ही एक प्रकारची भावनात्मक अलिप्तता आहे, ज्यामध्ये एक व्यक्ती अचानक दुसऱ्याकडे दुर्लक्ष करू लागते, जणू काही तो किंवा ती आयुष्यात कधीच अस्तित्वात नव्हती आणि ज्यामुळे दुसऱ्या व्यक्तीला अधिक त्रास होतो. समुदेशक अजित भिडे यांनी ही संकल्पना स्पष्ट केली आहे आणि याचे काय परिणाम होतात तेदेखील सांगितले आहे भावनिक असुरक्षितता बऱ्याच वेळा लोकांना नातेसंबंधांमध्ये असुरक्षित वाटते आणि त्यांना असे वाटते की त्यांच्या जोडीदारापासून वेगळे होण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे कोणतेही कारण न देता नात्यातून बाहेर पडणे. यामागचे कारण अनेकदा आत्मविश्वासाचा अभाव किंवा भविष्याबद्दल असुरक्षितता असू शकते. मात्र यामुळे समोरचा व्यक्ती अधिक त्रासला जातो आणि भावनिक अधिक खचला जातो याची काळजी घेतली जात नाही कमिटमेंटची भीती काही लोक वचनबद्धतेच्या विचाराने घाबरतात आणि जेव्हा नातेसंबंधात गांभीर्य येऊ लागते तेव्हा ते गांभीर्य अनेकजण हाताळू शकत नाहीत. त्या जबाबदारीपासून स्वत:ला वाचवण्यासाठी असे लोक 'घोस्टिंग'चा अवलंब करतात आणि या नात्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. मात्र हे दोन्ही व्यक्तींसाठी योग्य नाही भावना न मांडता येणं काही लोकांना त्यांच्या भावना नीट मांडता येत नाहीत आणि नात्यात निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देण्याऐवजी ते शांतपणे निघून जाणेच बरे असे त्यांना वाटते. कठीण संवाद टाळण्याचा हा एक मार्ग आहे आणि यामुळे नातं एका वळणावर येऊन तुटण्याची शक्यता अधिक असते. कारण समोरची व्यक्ती एका मर्यादेपर्यंत हे वागणं सहन करू शकते इंटरेस्ट संपणे अनेक वेळा असं होतं की जोडीदाराला नात्यात रस नसतो, पण त्याला थेट सांगण्याची हिंमत नसते. अशा परिस्थितीत 'घोस्टिंग' हा एक सोपा पर्याय बनतो कारण तो कोणत्याही प्रकारचा वाद किंवा भावनिक चर्चा टाळू शकतो. मात्र याचा परिणाम समोरच्या मनाच्या व्यक्तीवर काय होऊ शकतो याबाबत खोलवर विचार केला जात नाही. आपला इंटरेस्ट संपला म्हणजे सर्व काही संपले या स्वार्थी विचाराने हे पाऊल उचलले जाते. घोस्टिंगचा परिणाम 'घोस्टिंग'चा पीडितेवर खोल भावनिक प्रभाव पडतो. ज्या लोकांना याचा सामना करावा लागतो त्यांना अनेकदा नाकारल्यासारखे वाटते, त्यांचा स्वाभिमान दुखावला जातो आणि ते नाते तुटण्याचे खरे कारण समजू शकत नाहीत. या अचानक झालेल्या बदलांमुळे मानसिक तणाव आणि नैराश्यही येऊ शकते आणि याचा परिणाम अनेकदा टोकाचे पाऊल उचलण्यामध्येही होऊ शकतो. स्वतः ला कसे सांभाळाल? 'घोस्टिंग'चा सामना करणाऱ्या लोकांसाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही स्वतःला दोष देऊ नका. हे समजून घेणे महत्वाचे आहे की दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तनावर तुमचे नियंत्रण नाही. जर तुम्हाला 'घोस्टिंग'चा अनुभव येत असेल, तर हे नाते तुमच्यासाठी योग्य नसल्याचे समजून घ्या. याशिवाय आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी मित्र किंवा थेरपिस्टशी बोलणे देखील फायदेशीर ठरू शकते.

# लातूर ग्रामीण मधून लाडक्या बहिणीच्या वतीने महायुतीचे आ. रमेशआप्पा कराड यांचा अर्ज दाखल

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा केंद्रीय माजी अर्थराज्यमंत्री खा भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. लातूर ग्रामीण मतदारसंघात रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या विविध विकास कामाची पावती मतदार जनता देणार असून विजय आपला निश्चित आहे तेव्हा कार्यकर्त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने जिद्दीने कामाला लागावे असे आव्हान केंद्रीय माजी अर्थ राज्यमंत्री खा. भागवत कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात गावागावात वाडी वस्तीत केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर यावेळी निश्चितपणे परिवर्तन होणार असून भाजपा महायुतीचे उमेदवार आ रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी अत्यंत साध्या पद्धतीने आपला उमेदवारी दाखल केला यावेळी केंद्रीय माजीमंत्री खा. भागवत कराड, शिवसेना संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर बाबा शेख, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, माजी जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गोडभरले, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, राष्ट्रवादीचे विनोद आंबेकर, अमोल पाटील, त्र्यंबकआबा गुट्टे, अशोक काका केंद्रे, महेंद्र गोडभरले, वसंत करमोडे, वैभव सापसोड, सतीश आंबेकर, हनुमंत बापू नागटिळक, अभिषेक आकनगिरे, डॉ बाबासाहेब घुले, साहेबराव मुळे, पद्माकर चिंचोलकर, सुरज शिंदे, विजय काळे, बापूराव चामले, अमर चव्हाण, संजय ठाकूर, उमेश बेद्रे, अनंत चव्हाण, प्रताप पाटील, समाधान शितोळे यांच्यासह





अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) किसान मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष भास्कर लहाने यांनी आपल्या असंख्य सहकार्यासह भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील प्रीती बुलबुले, शेख नसीमा, माया घोडके, सरुबाई चव्हाण या पात्र महिलांनी रमेशआप्पा कराड यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर उपस्थित मतदार संघातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना खा. भागवत कराड म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून आ रमेशआप्पा कराड यांनी मतदार संघाची मजबूत बांधणी केली असून काँग्रेसच्या घराणेशाही विरुद्ध लढण्यासाठी आप्पांचा विजय महत्त्वाचा आहे यासाठी सर्वांनी अहोरात्र मेहनत घेऊन काम करावे, आपल्या बुथवर विजय हाच रमेशआप्पांचा विजय आहे. आप्पा निवडून आल्यानंतर लातूर ग्रामीण मतदार संघ विकासाची नांदी ठरणार आहे तेव्हा सर्वांनी एक दिलाने बहुमतासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात शासनाच्या माध्यमातून केलेल्या विविध विकास कामाची सविस्तर माहिती दिली. कोणत्या ना कोणत्या योजनेचे प्रत्येक कुटुंब लाभार्थी आहेत. या सर्व योजना भविष्यात चालू ठेवण्यासाठी गावा गावातील विकासाला गती देण्यासाठी राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा येणे गरजेचे आहे. लाडक्या बहिणीचा भावाच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात असणार आहे. आज पर्यंत मी केलेल्या कामाची पावती देण्याची हीच वेळ असून प्रत्येक कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून मतदाराच्या घराघरात जाऊन मिळालेला योजनेची जाणीव करून द्यावी मी केलेले काम सांगावे असे सांगून काँग्रेस कडून मोठ्या प्रमाणात अफवा पसरवल्या जातील यावर विश्वास न ठेवता जिद्दीने काम करावे असे आवाहन केले. एक लहाने गेला तर दुसरे दहा लहाने आले. गेले ते कावळे होते राहिले ते मावळे आहेत असेही त्यांनी बोलून दाखविले.

गेल्या २५–३० वर्षापासून साम दाम वापरून देशमुखशाही टिकून ठेवण्याचे काम झाले फक्त आणि फक्त एकाच घरात सत्ता असली पाहिजे यासाठीच काँग्रेस पुढाऱ्याचे काम असल्याचे सांगून शिवसेना संपर्कप्रमुख बळवंत जाधव म्हणाले की, लोकशाहीची पूर्ण स्थापना करून संकटाला धावून येणारा, विकासाला गती देणारा आणि अडचणीत मदत करणारा निस्वार्थी शेतकरी पुत्र आ रमेशआप्पा कराड यांनाच बहुमताने विजयी करण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षांनी जिद्दीने काम करावे.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, फकीरा ब्रिगेडचे प्रा. संजय शिंदे, भाजपाचे नवनाथ भोसले, हनुमंतबापू नागटिळक, अनिल भिसे, अभिषेक आकनगिरे, ललिता कांबळे यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले प्रारंभी दशरथ सरवदे यांनी प्रस्तावित केले तर शेवटी भागवत सोट यांनी उपस्थित यांचे आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

याप्रसंगी गोविंद नरहारे, चंद्रसेन लोंढे नाना, गोपाळ पाटील, सुकेश भंडारे, महेश गाडे, उत्तरेश्वर हेरकर, राम मोरे, लक्ष्मण यादव, श्याम वाघमारे, पांडुरंग बालवाड, धनराज शिंदे, अंबादास राठोड, श्रीमंत नागरगोजे, फुलचंद अंधारे, श्रीकृष्ण जाधव, काशिनाथ ढगे, अशोक सावंत, बालाजी शिंदे, सोमनाथ आप्पा पावले, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, श्रीकृष्ण पवार, महादेव मुळे, विजय गंभीरे, बाबुराव कस्तुरे, शरद दरेकर, उत्तम चव्हाण, विश्वास कावळे, रमा चव्हाण, रशीद पठाण, राजू आलापुरे, जलील शेख, ललिता कांबळे, सुरेखा पुरी, अनुसया फड, लता भोसले, शीला आचार्य, दिलीप पाटील, नरसिंग येलगटे, विठ्ठल कस्पटे, शेख अजीम, विनायक मगर, शरद शिंदे, ज्ञानोबा भिसे, महेश कणसे, बालाजी गवळी, अभिजीत मद्दे, रामकिशन गोरे सुरेश बुड्डे राजेंद्र गिरी, महेश वाघमारे, राम बंडापल्ले, ज्ञानेश्वर जुगल, लक्ष्मण नागिमे, आदिनाथ मुळे, सुरज जाधव, ईश्वर बुलबुले, खंडू सुरवसे, योगीराज साखरे, प्रशांत शिंदे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा व मित्र पक्षाचे प्रमुख पदाधिकारी बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यापारी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध : ना. संजय बनसोडे

उदगीर / बाबासाहेब मादळे :– उदगीर विधानसभा मतदार संघाचा लोकप्रतिनिधी या नात्याने या भागातील सर्वच समाजघटकांचे प्रश्न आपण सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. आगामी काळात व्यापारी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहून काम करणार असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी शहरातील व्यापारी बांधवांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजप ओबीसी सेलचे शहराध्यक्ष तथा दक्षिण रेल्वे बोर्डाचे सल्लागार समिती सदस्य मोतीलाल डोईजोडे, उद्योजक सागर महाजन, ज्येष्ठ व्यापारी प्रदीप बेद्रे, सुभाष वाकुडे , अनिरुध्द गुरुडे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले की, उदगीरच्या व्यापारी बांधवांनी आपल्यावर कायम प्रेम केले आहे. आपण राज्याचा मंत्री म्हणून काम करीत असताना येथील व्यापारी बांधवांची मान खाली जाईल असे काम कधी केले नाही, असे सांगून ते म्हणाले की, येथील व्यापार उदयोग वाढला पाहिजे यासाठी या भागात रेल्वेचे जाळे वाढण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. या भागात मोठे उद्योग आले पाहिजेत याकरिता भव्य असे विमानतळ उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असून आगामी काळात असे महत्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध राहून काम करणार असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन नरसिंग कंदले यांनी केले. यावेळी रामदास जलकोटे, नारायण वाकुडे, विजय मांगुळकर, गोपाळ पाटील, गोपाळ मुक्कावार, महादेव स्वामी, विजयकुमार पारसेवार, बालु पाटील, जगदीश चौधरी, बंडूनाना हुंडेकरी, भाऊचंद पाटील, जाबेर मलकजी, मोहम्मद आसिफ यांच्यासह व्यापारी बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी आई–वडीलांकडे मतदान करण्याचा आग्रह धरावा !

**– प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई**

लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूर द्वारासंचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर येथे स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान शपथ देण्यात आली, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, एन.सी.सी केअरटेकर प्रा. डॉ. सुजित हांडीबाग, एन.एस.एस कार्यक्रमाधिकारी प्रा. किसनाथ कुडके यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, २३५, विधानसभा निवडणुक दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी लातूर जिल्ह्यात संपन्न होणार आहे. आपण स्वीप कार्यक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रम राबविले. त्याचाच एक भाग म्हणून



आज आपणास सामूहिक सामुहिक शपथ देण्यात येत आहे असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार एन.सी.सी केअरटेकर प्रा. डॉ. सुजित हांडीबाग यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील एन.सी.सी. कडेट्स उपस्थित होते.

# लातुरात महाविकास आघाडीचे जोरदार शक्तीप्रदर्शन माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार धिरज देशमुख यांचे उमेदवारी अर्ज दाखल










लातूर / प्रतिनिधी :– काँग्रेस महाविकास आघाडीने लातूर शहरात दि २९ ऑक्टोबर रोजी जोरदार शक्तीप्रदर्शन करीत लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी तर लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ऐतिहासीक स्थळी झालेल्या विराट सभेत भाजपाचे माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी आपल्या हजारो सहकार्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या प्रवेशाने भाजपामध्ये मोठा भूकंप झाला आहे. विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरील असून जिल्ह्यातील भाजपा महायुतीच्या सहा जागा टेन्शनमध्ये आल्या आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी तर लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर गंजगोलाईतील जय जगदंबा मातेची महापुजा झाल्यानंतर विराट रॅली निघाली. सजवलेल्या रथामध्ये माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार धिरज देशमुख, श्रीमती वैशालीताई देशमुख, सौ. आदिती देशमुख, सौ. दीपशिखा देशमुख यांच्यासह सर्व पदाधिकारी होते. प्रचंड उत्साहात वाजत गाजत ही विराट रॅली निघाली. रॅलीत तरुणांची लक्षणिय संख्या होती. त्यासोबत ज्येष्ठ महिला, पुरुष, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. टाळ, मृदंग, भजनी मंडळी, वासुदेव, धनगरी ढोल पथके, बॅण्ड पथकांची रेलचेल होती. 'काँग्रेस पक्षाचा विजय असो', 'महाविकास आघाडीचा विजय असो', 'अमित देशमुख तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'धिरज देशमुख तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'दिलीपराव देशमुखसाहेबांचा विजय असो', अशा घोषणांनी सारा आसमंत दुमदुमून गेला होता. रॅलीत सहभागींना जागोजागी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. रॅली मार्गावर ठिकठिकाणी फुलांची उधळण करुन रॅलीचे स्वागत करण्यात आले. मेन रोड मार्गे हनुमान चौक, महात्मा गांधी चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर पोचली. तेथे या विराट रॅलीचे विराट सभेत रुपांतर झाले. सभास्थळ हाऊसफुल्ल झाले होते. मंडळपामध्ये जितके नागरिक होते त्यापेक्षाही अधिक नागरिक मंडपा बाहेर होते. या विराट रॅलीने व विराट सभेने वातावरण काँग्रेस महाविकास आघाडीमय झाले. लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर काँग्रेस महाविकास आघाडीच्या प्रचार शुभारंभाची विराट सभा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेस खासदार इम्रान प्रतापगडी, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस कुणाल चौधरी, धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार धिरज विलासराव देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, टवेन्टिवन अॅग्रीच्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख, रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिक्षा देशमुख, उल्हास पवार, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी महापौर अॅड़ दीपक सुळ, माजी महापौर प्रा. डॉ. स्मिता खानापूरे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, निलंगा विधानसभा मतदार संघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार अभय साळूंके, श्रीपती काकडे, महाराष्ट्रप् प्रदेश काँग्रेसे सरचिटणीस मोईज शेख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुनिल बसपूरे, शेतकरी कामगार पक्षाचे भाई उदय गवारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, काँग्रेसचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष किरण जाधव, अल्पसंख्याक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अॅड़ फारुक शेख, अनुसूचित जाती काँग्रेस सेलचे प्रा. प्रविण कांबळे, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन अॅड़ जाधव, जिल्हा बँकचे संचालक पृथ्वीराज सिरसाट यांच्यासह काँग्रेस महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कुणाल चौधरी, अभय साळुंके यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. स्मिता खानापूरे यांनी केले. प्रारंभी महापुरुषांच्या तसबिरींना पुष्प अर्पण करण्यात आले. शंखनाद करुन, मशाल प्रज्वलीत करुन प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. सुत्रसंचालन प्रा. सचिन सूर्यवंशी व प्रा. शिवाजी गायकवाड यांनी केले. या विराट सभेस जनसमुदाय उपस्थित होता.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE